ठळक बातम्या

- राज्यात ई-पीक पाहणीची मुदत ३० नोव्हेंबरपर्यंत वाढवण्याचा राज्य सरकारचा निर्णय

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या गडचिरोली इथं होणाऱ्या जनजातीय गौरव दिवसाच्या मुख्य कार्यक्रमाला दूरस्थ पद्धतीनं संबोधित करणार

- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उद्यापासून २ दिवसांच्या पुणे दौऱ्यावर

- महादेव ॲप या बेकायदा ऑनलाईन सट्टेबाजी प्रकरणी मुंबई-नागपूरसह देशभरातल्या ३३ ठिकाणांवर सीबीआयचे छापे

आणि

- पाकिस्तानवर अखेरच्या चेंडूवर १ गडी राखून विजय मिळवत भारतीय संघानं पटकावलं १९ वर्षांखालच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेचं जेतेपद

<><><><><><>

राज्यात ई-पीक पाहणीची मुदत ३० नोव्हेंबरपर्यंत वाढवण्यात आल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. नागपूर इथं ते वार्ताहरांशी बोलत होते. मोबाईल नेटवर्क नसलेल्या भागांमध्ये शेतकऱ्यांना ऑफलाइन पद्धतीनेही ई-पीक पाहणी करता येईल, असंही ते म्हणाले.

होल्ड... बाईट- चंद्रशेखर बावनकुळे

याबरोबरच, दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतरस्त्यांची कामं मोठ्या प्रमाणावर हाती घेणं, पीक विम्याच्या तक्रारींचं निराकरण, फळबागा वाचवण्यासाठी बोअरवेलला परवानगी आणि पाणी बचतीसाठी महत्त्वपूर्ण उपाययोजना करण्यात येत असल्याची माहितीही चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. यासंदर्भातलं परिपत्रकही विभागानं जारी केलं आहे.

<><><><><><>

पारंपरिक कुंभार समाजाला विटा, कौलं आणि मातीच्या इतर पारंपरिक वस्तू तयार करण्यासाठी वर्षाला ७०० ब्रासपर्यंत माती उत्खननावर रॉयल्टीमध्ये सूट देण्यात आली आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या निर्णयाची घोषणा केली आहे. यासंदर्भातल्या

सर्वसमावेशक धोरणाअंतर्गत गावातले तलाव, पाझर तलाव आणि शेतकऱ्यांच्या शेतातली माती किंवा गाळ स्वखर्चाने नेला, तरर रॉयल्टी न आकारण्याचा निर्णयही त्यांनी जाहीर केला. या सवलतींचा लाभ घेण्यासाठी महाखनिज या प्रणालीवरून तहसीलदारांकडे अर्ज करून १५ दिवसांत ५ वर्षांची वैधता असलेलं स्वतंत्र ओळखपत्र कुंभार समाजातल्या व्यक्तींना मिळवता येईल.

<><><><><>

भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त, जनजातीय गौरव दिवसाच्या गडचिरोली इथं होणाऱ्या मुख्य कार्यक्रमाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या दूरस्थ पद्धतीनं संबोधित करणार आहेत. ३ हजार कोटी रुपयांच्या २४६ विकास प्रकल्पाचं लोकार्पण आणि पायाभरणीही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे. देशभरातल्या आदिवासी बांधवांसाठी शिक्षण, आरोग्य सुविधा, रोजगार आणि पायाभूत सुविधा क्षेत्राला या प्रकल्पांमुळे चालना मिळेल. राज्यपाल जिष्णु देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर यावेळी उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, 'भगवान बिरसा कला संगम २' या राष्ट्रीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाला आजपासून गडचिरोली इथं सुरुवात झाली.

<><><><><>

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा उद्यापासून दोन दिवसांच्या पुणे दौऱ्यावर येणार आहेत. उद्या दुपारी ते तळेगाव दाभाडे इथल्या एनएचईसी मल्टी-स्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या भूमिपूजन समारंभात सहभागी होतील. त्यानंतर दूरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून केंद्रीय सहकारी संस्था निबंधकांच्या प्रादेशिक कार्यालयाचं उद्घाटन करतील. तसंच, भारत टॅक्सी सेवेचा प्रारंभही शहा यांच्या हस्ते होणार आहे. सोमवारी अमित शहा भारतीय जैन संघटना आणि शांतिलाल मुथा फाउंडेशनच्या मुख्यालयाला भेट देतील. त्यानंतर जिल्हा परिषद कार्यालयातल्या यशवंतराव चव्हाण भवनात माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या पुतळ्याचं अनावरणही त्यांच्या हस्ते होणार आहे.

<><><><><>

विदर्भात जलसंधारणासाठी सामूहिक प्रयत्न करण्याची गरज केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली आहे. ते आज नागपूर इथं आयोजित १७ व्या ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शनात बोलत होते. मँगनीज ओअर इंडिया लिमिटेड आणि वेस्टर्न कोलफिल्ड्स

लिमिटेडच्या खाणींमधलं साचलेलं पाणी सौर पंपांच्या मदतीनं शेतकऱ्यांना शेतीसाठी उपलब्ध करून द्यावं, अशी सूचना त्यांनी केली. या विषयावर चर्चा करण्यासाठी येत्या डिसेंबरमध्ये विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेत होणाऱ्या परिषदेला या दोन्ही कंपन्यांच्या प्रतिनिधींना निमंत्रित करावं अशी विनंतीही त्यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना केली.

<><><><><><>

राज्यातले पारंपरिक उद्योग, महिला बचत गट, सूक्ष्म आणि लघुउद्योजक तसंच 'एक जिल्हा, एक उत्पादन' उपक्रमातल्या उत्पादकांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं प्रतिपादन, उद्योग आणि गुंतवणूक मंत्री उदय सामंत यांनी केलं आहे. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं ४५ व्या भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळ्यातल्या महाराष्ट्र दालनाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. या मेळ्यात पैठणी, कोल्हापुरी चप्पल, विदर्भातल्या साड्या, खादी आणि ग्रामोद्योग उत्पादनांचे सुमारे ६५ स्टॉल उभारण्यात आले आहेत.

<><><><><><>

नवी मुंबई ते सिंधुदुर्ग दरम्यानच्या विमान प्रवासाला येत्या १६ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार आहे. ही विमानसेवा दररोज सुरू ठेवण्यात येईल. सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांनी आज समाज माध्यमावर ही माहिती दिली आहे.

<><><><><><>

महादेव ॲप या बेकायदा ऑनलाईन सट्टेबाजी प्रकरणी सीबीआय अर्थात केंद्रीय अन्वेषण विभागानं गेल्या काही दिवसांमध्ये महाराष्ट्रासह ६ राज्यांमधल्या ३३ ठिकाणांवर छापे टाकले. यात मुंबई, नागपूर, तसंच सूरत, वडोदरा, अहमदाबाद, इंदूर, भोपाळ, दुर्ग, रायपूर, धोलपूर, नागौर, दिल्ली, अमृतसर या शहरांचा समावेश आहे. या प्रकरणातला मुख्य आरोपी सौरभ चंद्राकर याने दिलेल्या माहितीच्या आधारावर ही कारवाई करण्यात आली. या ठिकाणी सुरू असलेली सट्टेबाजी आणि जुगार कारवाईदरम्यान रोखण्यात आला. या कारवाईत डिजिटल उपकरणं, मोबाईल फोन आणि काही आक्षेपार्ह दस्तावेज जप्त करण्यात आले. दुसऱ्याच्या नावानं उघडली गेलेली बनावट बँक खाती आणि हवाला जाळ्याचा वापर या सट्टेबाजीसाठी होत असल्याचंही समोर आलं आहे.

<><><><><><>

पुण्यातल्या वैशाली आणि रूपाली या प्रसिद्ध उपहारगृहांचे परवाने अन्न आणि औषध प्रशासनानं निलंबित केले आहेत. 'सुरक्षित अन्न, सुरक्षित महाराष्ट्र' मोहिमेअंतर्गत, काल झालेल्या तपासणीत या दोन्ही उपाहारगृहांमध्ये अस्वच्छता, अन्नपदार्थांची अयोग्य साठवणूक, स्वयंपाकघरातली असुरक्षित परिस्थिती आणि स्वच्छतेच्या गंभीर त्रुटी आढळल्या. त्रुटी दूर करून प्रशासनाची लेखी परवानगी मिळेपर्यंत दोन्ही उपाहारगृहांना विक्री, पार्सल आणि घरपोच सेवा बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

<><><><><><>

हिमोफीलिया या दुर्मिळ रक्तविकारावर आयुर्वेदाधारित संशोधनासाठी राबवण्यात येणाऱ्या 'धाराशिव पॅटर्न' या संशोधन कार्याला भारत सरकारच्या कॉपीराइट विभागाकडून अधिकृत कॉपीराईट प्रमाणपत्र मिळालं आहे. यामुळे या संशोधन कार्याची राष्ट्रीय स्तरावर बौद्धिक संपदा म्हणून अधिकृत नोंद झाली आहे. दोन वेळा राष्ट्रीय पुरस्कार विजेते, आयुर्वेद चिकित्सक आणि संशोधक डॉक्टर शुभम धूत यांच्या पुढाकारातून हा संशोधन प्रकल्प सुरू आहे.

<><><><><><>

मुंबईत आग्रीपाडा परिसरात आज मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेनं सापळा रचून एका तरुणाला बेकायदेशीर शस्त्रं बाळगल्याप्रकरणी अटक केली. त्याच्याकडून दोन गावठी पिस्तुलं आणि १९ जिवंत काडतुसं जप्त करण्यात आली. त्याच्यावर शस्त्र कायदा आणि महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही शस्त्रं कुठून आली आणि स्थानिक पातळीवर ती पुरवण्याचा आरोपीचा हेतू होता का, याचा तपास पोलीस करत आहेत.

<><><><><><>

भारतानं आज पाकिस्तानवर अखेरच्या चेंडूवर १ गडी राखून विजय मिळवत १९ वर्षांखालच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेचं जेतेपद पटकावलं. ओमान इथं आज झालेल्या थरारक अंतिम सामन्यात पाकिस्ताननं विजयासाठी ठेवलेलं ३३८ धावांचं लक्ष भारतानं शेवटच्या चेंडूवर गाठलं. त्याआधी ९५ धावांच्या चांगल्या सलामीनंतरही ४२ व्या षटकात भारतानं २५२ धावांत ८ गडी गमावले होते. मात्र ९व्या गड्यासाठी मनल आणि मोहित यांनी

५७ धावांची भागीदारी करत भारताच्या विजयाच्या आशा कायम ठेवल्या. मनल बाद झाल्यावर मोहित यानं चिगुरुपती याच्याबरोबर अखेरच्या गड्यासाठी नाबाद ३० धावांची भागीदारी केली, आणि अखेरच्या चेंडूवर चौकार मारत भारताला जेतेपद मिळवून दिलं.

<><><><><><>

राज्यात काही ठिकाणी किमान तापमानात सरासरीपेक्षा लक्षणीय घट झाली आहे. आज यवतमाळ इथं सर्वांत कमी, १२ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. पुणे इथं १३ पूर्णांक ९ दशांश अंश सेल्सिअस, तर नागपूर इथं १४ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सिअस किमान तापमान नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवस राज्यभरात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता आहे. येत्या काही दिवसांत किमान तापमानात २ ते ३ अंशाची घसरण होण्याचा अंदाज आहे.

//<><><><><><>//